# जावे त्याच्या गांवा

## गप्पागोष्टी

"ट्रींग ट्रींग... ट्रींग ट्रींग"
सकाळी सकाळी फोन वाजला आणि रविवारी एवढ्या सकाळी कोणाचा फोन असावा असा विचार करत धावत जाऊन मी फोन घेतला.
"गुटन मॉर्निंग", पलिकडून आवाज आला.
" नीता", मी आनंदाने साद दिली. खूप दिवसांनी माझ्या चुलत बहिणीचा – नीताचा – आवाज ऐकून मी आनंदले. " अग काय हे नीता, जर्मनीत राहून जर्मन झालीस कां? चांगलं सुप्रभातम् म्हणावं!"
" अग मंगल, तू नाही का, ॲटलांटाकर झालीस इतक्या वर्षात? बरं ते जाऊ दे. काय म्हणतंय तुमचं ॲटलांटा?"
"नीता तू होतीस ना, तेव्हांपासून आता अगदी खूपच बदललंय. तू १९८९ साली ॲटलांटा सोडलस नाही का गं? तूला आठवतं? त्यावेळेस मोजून दोन 'इंडियन ग्रोसरी स्टोअर्स' होती. आपण एक तास ड्राईव्ह करून इंडियन ग्रोसरी आणायला जात होतो आणि आता इतकी इंडियन स्टोअर्स झाली आहेत. माझ्या तर रस्त्याच्या दोन्ही टोकांना दोन इंडियन ग्रोसरी स्टोअर्स आहेत. अगं, पूर्वी इंडियन ग्रोसरी स्टोअर्समधे किंवा कुठेही भारतीय कुटुंब दिसलं की आपल्याला किती आनंद व्हायचा आणि आता साधं ट्रॅफिक लाइटला कार थांबली की आजुबाजुला १, २ तरी भारतीय कुटुंबाच्या कार्स दिसतात आणि इंडियन रेस्टॉरंट्स तर विचारूच नकोस. ॲटलांटाच्या प्रत्येक भागात २,३ झाली असतील. पूर्वी भारतात जाऊन आपल्या बडोद्याची प्यारेलालची कचोरी किंवा मुंबईची भेळ, पाणीपुरी खायची असं ठरवावं लागायचं आणि आता या गोष्टी ॲटलांटात अगदी सर्रास मिळतात. झालच तर भारतीय दागिने, कपड्यांची दुकाने यांचीही संख्या वाढतच चालली आहे. कुठल्याही गोष्टींसाठी भारतात जाईपर्यंत वाट बघायची गरज नाही."
"मंगल, अग किती चांगलं! आमच्या जर्मनीत असं कधी होईल गं?"
"नीता, मला हल्ली तयार ताज्या चपात्यासुद्धा दुकानात मिळतात!"
"अगं काय सांगतेस मंगल! लकी आहेस बाई! आणि शिवांगीचा डान्स क्लास कसा चाललाय? कथ्थक शिकतेय नं ती?"
"अगदी छान चालू आहे. नीता, तू कथ्थक डान्सर असल्यामुळे तुला तुझ्या मुलींना डान्स शिकवायचा होता पण त्यावेळेस ॲटलांटामध्ये कुठल्याही प्रकारचे भारतीय नृत्याचे क्लासेस नव्हते. पण आता कथ्थक, भरतनाव्यम, मणीपुरी..अगदी बॉलीवूड डान्स क्लासेसही आहेत, अगदी मुलांसाठीही आहेत. त्याशिवाय तबला, हार्मोनियम, बासरी हे पण शिकवतात. आणि हे शिकवणारी आपली मराठी माणसंही आहेत. यापैकी काही संस्थांनी पदवी परिक्षा चालू केल्या आहेत. बालविहार संस्थेतर्फे हिंदी शाळा चालवली जाते व भारतीय संस्कृतीचेही शिक्षण देतात."
"मंगल, भारतीय कार्यक्रमांचं काय गं? पूर्वी आपल्याला एखादा भारतीय कलाकार बघायला, ऐकायला मिळाला तरी कित्ती अपूर्वाई वाटायची."
"नीता, पूर्वी व्हायचे तसे ICMS तर्फे शास्त्रोक्त संगीताचे कार्यक्रम अजूनही होतात. पण त्याबरोबर आता बॉलीवूडचे कलाकारही येऊ लागले आहेत. 'स्लम डॉग मिलेनियर'मुळे अमेरिकन जनता बॉलीवूडला ओळखू लागली आहे. हिंदी चित्रपट अमेरिकन चित्रपटगृहात बघता येतात."
"काय सांगतेस काय? पण काही म्हण मंगल, ॲटलांटाच्या महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमांना मी फारच मिस करते हं! अजून कार्यक्रम स्मिरनाच्या चर्चमध्येच होताता कां? आमच्या जर्मनीत अजून महाराष्ट्र मंडळ वगैरे काही नाही."
"कसं शक्य आहे? स्मिरनाचं चर्चतर मंडळाला कधीच पुरेनासं झालं. सध्या ॲटलांटामधे ५००च्या वर मराठी कुटुंबे आहेत. त्यामुळे १९८९ सालासारखं सगळ्यांना आम्ही आता प्रत्यक्ष ओळखतसुद्धा नाही. आता हायस्कूलच्या हॉलमधे कार्यक्रम होतात. तुला आठवतं, त्यावेळी मी आणि कारखानीस काका आमच्या हस्ताक्षरात मराठी मंडळाचे पत्रक काढीत असू. आता 'गुजगोष्टी' नावाचा सुंदर दिवाळी अंक निघतो. थेट भारतासारखा. त्याशिवाय कार्यक्रमांचा उत्साह तर विचारूच नकोस. प्रत्येक वर्षी नवीन दमाची कार्यकारिणी तयार होते आणि नवीन कल्पना आखून चांगले कार्यक्रम सादर करते."
"नीता, यंदा मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. पहिलाच कार्यक्रम 'स्वराली' हा गाण्याच्या ऑर्केस्ट्राचा होता. फारच सुंदर झाला. पुढे वर्षभर विविध कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे."
"मंगल, फारच नशिबवान आहात बुवा तुम्ही. २००५ सालचं अधिवेशन सुद्धा खूप छान झालं होतं."
"नीता, हल्ली गणपती उत्सव, नवरात्रातील गरबा असे धार्मिक उत्सव होतात. हिंदू मंदिर, व्यंकटेश्वर मंदिर, स्वामीनारायण मंदिर, साईबाबा मंदिर अशी अनेक मंदिरांचीही उभारणी झाली आहे. तेथील गुरूजी पूजा सांगायला घरी येतात. पूर्वीसारखे कॅसेटवर भागवावे लागत नाही. दत्तसंप्रदायातील संत वासुदेवानंद सरस्वती यांचेही भक्त ॲटलांटात आहेत."
"मंगल, खरंच खूप बदललंय ॲटलांटा! आपल्या नातेवाईकांशिवाय तुला इतर कोणत्याच गोष्टींसाठी भारताची आठवण येत नसेल."
"खरंच बाई, नीता! न्यूयॉर्कहून ॲटलांटाला आले तेव्हां मुंबईहून पुण्याला आल्यासारखं वाटलं होतं. आता ॲटलांटात राहणे पुण्यात राहण्यासारखेच आहे. पण आपण इंटरनॅशनल कॉलवर किती वेळ बोलतोय, नवऱ्यांना कळलं तर खैर नाही. आता पुढल्यावेळी गुगलवरच बोलू. बाय!"

**सौ. शैलजा मेढेकर** (माहेरची मंगल सुळे), ॲटलांटा